http://www.epitomejournals.com, Vol. 4, Issue 2, February 2018, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# संत एकनाथ महाराजांच्या अभंगातून व्यक्त होणारे साधनेतील सोपान

- डॉ यशोद श्रीमंतराव पाटील

संत एकनाथ महाराजांचे कार्य खूप महान आहे. त्यांचे अभंग प्रासादिक आहेत. नाथांचे अभंग हे साधकासाठी शोधदिपकाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात .

काळाने ग्रासिले सावधान व्हा रे । सोडवण करा रे हरिनामे ।।१।।
आयुष्य सरलीया कोण पां सांगती। पुढे हो फजिती यमदंड ।।२।।
उपाय तो सोपा नामाचा गजर। न करी विचार पुढे कांहीं ।।३।।
एका जनार्दनीं तूं कां रे अंधळा। देखतोसी डोळां सुख दु:ख।।४।।

संत एकनाथ महाराज म्हणतात काळाने तुम्हाला गिळले असून तुम्ही सावध व्हा रे हरिनाम स्मरण करून तुम्ही आपली सोडवणूक करा. आयुष्य संपल्यानंतर कोण बरे संगतीला आहे. नामाचा गजर सोपा असून पुढे काही दुसरा विचार करू नको, नाथ महाराज मनुष्याला म्हणतात की जीवन काळामध्ये आपण सुख दु:ख पाहतो तरीही आपण आपल्या जीवनात अज्ञानी राहिलो तर त्या गोष्टीचा उपयोग होणार नाही. म्हणून जीवन प्रवासात हरी नामस्मरण हा उपाय सोपा असून परमेश्वर प्राप्तीचे ते एक साधन आहे.

अल्प आयुष्य नरदेही जाण । काही तरी भजन करी वाचे ।।१।।
जाणार जाणार नरदेह जाणार । न चुके वेरझार जन्ममृत्यू ।।२।।
करी धंदा आठवी गोविंदा । वायां तूं आपदा नको घेंऊ ।।३।।
एका जनार्दनी पंढरी पाहुन । तेथें न करी मने ठेवणे देखा ।।४।।

संत एकनाथ महाराज म्हणतात नरदेहाला आयुष्य कमी आहे म्हणून वाणीने भगवंताचे भजन करा. नरदेह जाणार असून जन्म मृत्यूचे येणे - जाणे चुकवता येणार नाही. जन्म मृत्यूचे येणे - जाणे चुकवायचे असल्यास भगवंताचे स्मरण सतत ठेवायला पाहिजे, आपण व्यवहारातील कार्य करत असताना सुद्धा भगवंताचे स्मरण ठेवायला हवे व्यर्थ गोष्टी मध्ये वेळ घालून संकटे ओढून घेऊ नये. पंढरीच्या पांडुरंगाला पाहून पांडुरंगावर मन स्थापन करावे.

भगवंत प्राप्ती साठी साधकाने मन भगवंतावर स्थापन करावे, मन भगवंतावर स्थापन होण्यासाठी भगवंताचे स्मरण ठेवायला हवे म्हणजेच भगवंताचे अनुसंधान ठेवायला हवे असा मौलिक संदेश संत एकनाथ महाराज आपल्या अभंगातून साधकाला देतात.

देहाचिये माथां काळाची तो सत्ता । म्हणोनि सर्वथा घोका राम ।।१।।
आदि मध्य अंती काळ लागलाहे । क्षणक्षणां पाहे वास त्यासी ।।२।।
सर्व जाणोनियां अंधळे पैं होती । काळ नेतांचि देंखती ते दुजा ।।३।।

 All rights reserved.

परि रामनामी न धरिती विश्वास । निकट समयास धावाधावी ।।४।।

एका जनार्दनीं भुलले ते प्राणी । तया सोडवणी कोण करी ।।५।।

संत एकनाथ महाराज म्हणतात देहाच्या डोक्यावर काळाची सत्ता आहे म्हणून तुम्ही सर्वप्रकारे रामनामाचे स्मरण करत चला. बाल तरुण आणि वृद्ध अवस्थेमध्ये काळ पाठीमागे लागला आहे. काळाचे वास्तव्य क्षणाक्षणात आहे, दुसऱ्याला काळ नेताना पाहून मनुष्य अंधाळा होतो दुसऱ्याला काळ नेताना मनुष्य पाहतो, पण तरी सुद्धा राम नामावर विश्वास ठेवला नाही तर अशा मनुष्यास अंत काळी कोण मुक्त करील.

जीवन प्रवास हा क्षणिक आहे काळ कधी येईल हे सांगता येत नाही म्हणून राम नामावर विश्वास ठेवला पाहिजे निष्ठा ठेवली पाहिजे, भगवंताचे नामस्मरण हे निष्ठेने व विश्वासाने केले पाहिजे असा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश एकनाथ महाराज आपल्या अभंगातून देतात. साधकाने नामस्मरण हे निष्ठेने केले पाहिजे हे एकनाथ महाराजांना अभिप्रेत आहे.

येवोनिया काळ बैसलासे उसां । झांकितोसी कैसा डोळा आतां ।।१।।

वाचे नारायण वदें तूं सादर । काळपाश साचार चुके जेणें ।।२।।

वायां हा संसार करिसी हावभरी । काळाची तो फेरी निकट आली ।।३।।

एका जनार्दनी नको याता याती । संसार फजिती जन्मदु:ख ।।४।।

नाथ महाराज आपल्या अभंगाद्वारे मनुष्याला मार्गदर्शन करतात ते म्हणतात काळ येऊन उशाला बसला आहे, अशा वेळी डोळे का झाकतोस, नाथ महाराज म्हणतात मानवाने अत्यंत आदरपूर्वक वाणीने नारायण असा उच्चार केला पाहिजे ज्या योगे काळपाश खरोखरच चुकेल, काळाची ती फेरी कोणत्याही क्षणी निकट येईल त्यामुळे संसार हव्यासाने करणे व्यर्थ आहे संसारात रमून जाणे म्हणजेच जन्म मृत्यूचे येणे - जाणे या चक्रात अडकणे यामुळे दु:ख भोगावे लागते.

संत एकनाथ महाराज साधनेतील सोपान समजून सांगताना भगवंताचे नामस्मरण हे अत्यंत आदरपूर्वक भावाने केले पाहिजे असे सांगतात, साधना करतांनी भगवंताप्रती आदरपूर्वक व शुद्ध भाव असणे गरजेचे आहे या गोष्टीचे महत्त्व नाथ महाराज सांगतात, साधकासाठी अतिशय सुयोग्य मार्गदर्शन नाथ महाराज आपल्या अभंगातून करतात.

आला रे आला काळ निकटी । रामनाम कोटी केंव्हा जपसी ।।१।।

बाळ तरूण वृद्ध दशा ती पावली । काळाची पडली छाया अंगी ।। २।।

यातायाती करतां जन्म वायां गेला । परी नाही वदला मुखी राम ।।३।।

एका जनार्दनी फजितखोर जिणें । सवेचि मरणें पुढती जन्म ।।४।।

नाथ महाराज मनुष्याला मार्गदर्शन करताना म्हणतात आला रे आला काळ जवळ आला रामनामाचा जप केंव्हा करशील. बाल, तरुण वृद्धवस्था ती प्राप्त झाली आणि तुझ्या अंगावर काळाची सावली पडली, ईकडचा तिकडचा विचार केला पण रामाचे स्मरण केले नाही तर असा मनुष्य जन्म मृत्यूच्या चक्रात अडकतो व त्याला यातना सहन कराव्या लागतात.

संत एकनाथ महाराज साधनेतील सोपान समजवून सांगताना पर्मार्थ मार्गात नित्य सावधानतेला खूप महत्त्व देतात काळ कोणत्याही क्षणी येऊ शेक्तो त्याचा काही नियम नाही म्हणून अशा वेळी मनुष्याने निवांत न बसता नामस्मरण करावे. सावधानात हे साधनेतील महत्त्वपूर्ण सोपान असून त्या बरोबर नामस्मणाचे औचित्य साधावे असा लक्षणीय विचार नाथ महाराज आवल्या अभंगातून सांगतात.

सावधान सर्व आहे । तुझे हात आणि पाये। तोवरी तू जाये । तीर्थयात्रे कारणें ।।१।।

 All rights reserved.

http://www.epitomejournals.com, Vol. 4, Issue 2, February 2018, ISSN: 2395-6968

सरलीया आयुष्यकाळ । इंद्रियें होतील विकळ । काही न चले बळ । वाउगी ते तळमळ ।।२।।
डोळे कान नाक आहे । तोवरी संता शरण जाय । ही मावळलीया होय । हाय हाय तुजलागी ।।३।।
काय म्हणशी माझे माझे । हे तो शेवटीचे वोझे । एका जनार्दनी दुजें । तुज कोण सोडविल ।।४।।

नाथ महाराज म्हणतात हात आणि पाय हे सर्व चांगले आहे त्यावेळीच मनुष्याने तीर्थ यात्रा केली पाहिजे. आयुष्यवेळ संपत आली असता इंद्रिये विकल होतील त्या वेळी काहीही होणार नाही. डोळे कान नाक सुव्यवस्थीत आहे तो पर्यंत संताना शरण गेले पाहिजे. शरीर थकल्यावर हा देह देखिल ओझे वाटणार आहे म्हणून सर्व काळ अनुकूल असतानाच संतांना शरण जाणे महत्त्वाचे आहे. साधनेतील सोपान साधकाला सांगताना नाथ महाराज म्हणतात सर्व गोष्टी अनुकूल असतानाच तीर्थयात्रा नामस्मरण व त्याच बरोबर संतांना शरण जाणे हे कार्य केले पाहिजे.

साधकाने योग्य साधना करून पर्मार्थ प्राप्त करून घ्यावा यासाठी नाथ महाराजांनी नानाविध साधनेतील सोपान आपल्या अभंगातून सांगितले आहेत ,जेणे करून साधकाची पर्मार्थ मार्गावरील वाटचाल ही योग्य होईल व मनुष्याला पर्मार्थ बोध होईल.

संत एकनाथ महाराजांना शांतीब्रम्ह म्हटले जाते नाथमहाराजांच्या अभंगातून शांती रस प्रकट होतो आजच्या वर्तमान युगात, नाथ महाराजांचे अभंग हे मनुष्याला मन शांती प्रदान करतात. शांत रसाची सुरभी ही नाथ महाराजांच्या अभंगातून अनुभवयास येते.

नाथ महाराजांचे अभंग हे कर्णमधूर व प्रासादिक आहेत त्याचबरोबर साधनेतील सोपान अत्यंत सुबोध व सुयोग्य पद्धतीने नाथ महाराजांनी आपल्या अभंगातून वर्णन केले आहेत. संत एकनाथ महाराजांचे अभंग हे साधकासाठी शोधदिपकाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात .

## संदर्भ ग्रंथ

सरदार,गं.बा. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्री विद्याप्रकाशन पुणे १९८२.

पेंडसे, श भागवतोत्तम संत एकनाथ, नागपूर प्रकाशन, नागपूर,१६७१.

ढेरे, रा. चि. संत साहित्य आणि लोकसाहित्य काही अनुबंध, श्री विद्या प्रकाशन, पुणे   १९७८.

जाधव,रा.ग . आनंदाचा डोह प्राज्ञ पाठशाळा मंडळ वाई, १९७६.

ढेरे, रा. चि. संतांच्या आत्मकथा, पुष्पक प्रकाशन, पुणे, १९६७.

बेंद्रे, वा सी . संत तुकाराम, नॅशनल बूक ट्रस्ट, दिल्ली, १९६३.

बापट, प्र. वा . मराठी आख्यानक कविता, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९७१.



**डॉ यशोद श्रीमंतराव पाटील**

(सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग )

विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

समर्थनगर औरंगाबाद-४३१००१

 *Impact Factor = 3.656* *Dr. Pramod Ambadasrao Pawar* *Editor-in-Chief ©EIJMR* *All rights reserved.*